## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ५१/२०१७ मधील नि.२१ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ६ तर्फे कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून कैफियत आणि जबाब दाखल करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना दावा मिळकतीसंदर्भात आवश्यक ती महत्वाची कागदपत्रे महसुल अधिका—यांकडून विहित कालावधीत प्राप्त होऊ न शकल्यामुळे त्यांना कैफियत मुदतीत दाखल करता आली नाही. करिता सदरील कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत दाखल करुन घेणेबाबत विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांनी म्हणणे दाखल करुन न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश होण्याची विनंती केली.

४. अर्जातील कथने पाहता, प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी त्यांची कैफियत दाखल करुन त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळाल्यास दाव्याची चौकशी होवून दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालवण्यास मदत होणार आहे. अशी संधी त्यांना न दिल्यास त्यांचे कधीही व कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज मंजूर केल्यास वादीला कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु, प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केला असल्याने प्रतिवादीवर खर्च बसवता येवू शकतो. प्रतिवादी क्र.१ ते ६ तर्फे अर्जासोबत कैफियत दाखल केली आहे. करिता आदेश —

### आदेश

१. अर्ज रुपये १५०/— च्या खर्चावर मंजूर.

२. खर्चाची रक्कम दिल्यानंतर, प्रतिवादी क्र.१ ते ६ यांची कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ

करुन त्यांना कैफियत व जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

सही/—

कर्जत
( श्र.जि. डोलारे )
दिनांक : ०६/११/२०१७
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत
जि.रायगड.